# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०८/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा वराडा शिवार राहुल सिंग यांचे शेतात दि. ०६/०२/२०२२ चे २१.०० वा. ते २१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– संतोष इंद्रासन यादव(बस सेक्युरीटी इंचार्ज), वय ३८ वर्ष, रा. कामठी कॉलरी मडीबाबा क्वॉर्टर नं ५२७, खदान कन्हान हे पेट्रोलिंग करीत असतांना आरोपी नामे– भुजंग महल्ले वय ४८ वर्ष रा. टेकाडी कन्हान याने खदान मधुन अवैधरीत्या कोळसा जमा करून चोरून नेवुन वराडा गावाचे शिवारात राहुल सिंग यांचे शेतात ६४९० किलो कि ३२,०००/–रू. कोळसा ठेवलेला मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोना शालीनी बुटले हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील चनकापुर येथे दिनांक ०५/०२/२०२२ चे ११.४४ चे १७.००. दरम्यान फिर्यादी नामे– अश्लेशा अरविंद वासे, वय २३ वर्ष, रा. दिगलवाडी तह.पारशिवनी ह.मु.बी टाईप क्वॉर्टर नं १८/४ चनकापुर यांचे अकाउंट मधुन काही पैसे डेबीट झाल्याने ते पैसे का डेबीट झाले. याकरीता फिर्यादीने गुगल वरून एस.बी.आई कस्टमर केयर चा नंबर शोधुन फोन करून विचारणा केली असता अज्ञात आरोपीने फिर्यादीस एनीडेक्स ॲप डाउनलोड करण्यास सांगुन 'तुमचे पैसे रिफंड करून देतो' असे सांगुन यातील आरोपीने फिर्यादीचा एस.बी.आय अकाउंट मधुन क्रमश: ३०,०००/–रू., २५,०००/–रू. व ११,०००/– रू. असे एकुण कि. ६६,०००/– रू. काढुन घेत फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. ६६ माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री यादव पो स्टे खापरखेडा मो नं. ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर